# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि.

**दिनांकः03.09.2026** **वारःगुरुवार**

---

**ठळक बातम्या**

1. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या तीन महत्वपूर्ण उपक्रमांचा मुख्यमंत्र्याच्या हस्ते आरंभ.
2. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण गुणवत्तेला प्रोत्साहन देण्यासाठी मुंबई, पुणे आणि नागपूरच्या विद्यापीठांमध्ये 'कुलपती पदक' प्रदान करणार.
3. काँग्रेसच्या 10 दिवसांच्या निवासी प्रशिक्षण शिबिराचा नाशिक इथं समारोप.
4. दिशा सालियन मृत्यू प्रकरणाची चौकशी सीबीआयकडे सोपवण्याचे मुंबई उच्च न्यायालयाचे आदेश.

**आरोग्य उपक्रम आरंभ**

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या एकात्मिक आरोग्य डॅशबोर्ड, एकात्मिक आरोग्य सुविधा केंद्र आणि रुग्णालयांची स्टार रेटिंग प्रणाली या तीन महत्वपूर्ण उपक्रमांचा काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत आरंभ करण्यात आला. राज्यातील आरोग्यविषयक माहितीचं केवळ संकलन न करता तिचा लोकहितासाठी वापर व्हावा, अशी अपेक्षा मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केली. या उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करून नागरिकांना अधिक दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी विभागानं काम करावं अशी सूचनाही त्यांनी केली. सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यावेळी उपस्थित होत्या.

**'महाटॅक' उपक्रम**

राज्य शासनाच्या विविध महत्वपूर्ण योजना आणि धोरणांचा प्रत्यक्ष परिणाम तपासण्यासाठी तसंच सार्वजनिक निधीच्या खर्चातून अपेक्षित परिणाम साध्य होत आहेत का, याचं मूल्यमापन करण्यासाठी 'महाराष्ट्र टेक्निकल असिस्टन्स सेल'; महा-टॅक, स्थापन करण्यात येणार आहे. मुंबईतील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट आणि सेंटर फॉर रिसर्च इन स्कीम्स अँड पॉलिसीज यांच्या सहकार्याने हा कक्ष कार्यरत केला जाणार आहे. याद्वारे शासनाला वस्तुनिष्ठ माहिती आणि डेटा-आधारित निर्णय घेण्यास मदत होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत काल मुंबईत महा-टॅकच्या स्थापनेसंदर्भात सादरीकरण करण्यात आलं.

**'सॉफ्ट लोन योजना'**

राज्यातील सहकारी साखर कारखान्यांना पुढील गाळप हंगामाच्या पूर्वतयारीसाठी आणि शेतकऱ्यांना एफआरपीची रक्कम वेळेत देण्यास मदत व्हावी, यासाठी राज्यात केंद्र सरकारच्या धर्तीवर 'सॉफ्ट लोन योजना' लागू करण्यासंदर्भातील प्रस्ताव तात्काळ मंत्रिमंडळासमोर सादर करावेत, असे निर्देश उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी काल दिले. पवार यांच्या अध्यक्षतेखाली काल या संदर्भात आढावा बैठक झाली. साखर कारखान्यांची आर्थिक क्षमता वाढवण्याकरता विविध उपपदार्थांसाठी सर्वसमावेशक धोरण ठरवण्याची सूचना पवार यांनी यावेळी केली.

**मतदार यादी-चोक्क लिंगम**

राज्यातल्या मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षणातून एकही पात्र मतदार वगळला जाणार नाही असं मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी स्पष्ट केलं आहे. हरकती-सूचनांच्या सुनावणीसाठी संबंधितांना नोटीस बजावावी, तसंच दूरध्वनीद्वारे संपर्क साधून सुनावणीला उपस्थित राहण्याचं आवाहन करावं. संबंधित व्यक्तीकडून प्रतिसाद मिळाला नाही, तर

आदेशाची प्रत त्यांच्या व्हॉट्स्अॅप क्रमांकावर पाठवावी. संबंधित व्यक्तीला सुनावणीला उपस्थित राहण्यात अडचण असल्यास त्यांच्या नातेवाईकांना सुनावणीला उपस्थित राहून नागरिकत्वाचा पुरावा सादर करण्याची मुभा द्यावी, असे निर्देश चोक्कलिंगम यांनी दिले आहेत.

**<u>कुलपती पदक</u>**

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण गुणवत्तेला प्रोत्साहन देण्यासाठी मुंबई विद्यापीठ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात आता ‘कुलपती पदक’ प्रदान करण्यात येणार आहे. राज्यपाल आणि राज्य विद्यापीठांचे कुलपती जिष्णु देव वर्मा यांच्या पुढाकारानं सुरू करण्यात येत असलेल्या या उपक्रमासाठी काल मुंबईत लोकभवन इथं राज्यपालांच्या हस्ते तिन्ही विद्यापीठांच्या कुलगुरूंना प्रत्येकी 10 लाख रुपयांचा प्रातिनिधिक धनादेश प्रदान करण्यात आला. 'कुलपती पदक' हे केवळ शैक्षणिक गुणवत्तेपुरतं मर्यादित न ठेवता विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्वाची, नेतृत्व गुणांची, नवोन्मेषाची, क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्रातल्या कामगिरीची, सामाजिक बांधिलकीची दखल घेणारं  असावं अशी अपेक्षा राज्यपालांनी व्यक्त केली.

**<u>'शाळेत जाऊया' अभियान</u>**

राज्यातल्या शाळांची परिस्थिती सुधारण्यासाठी राज्य सरकार 'चला शाळेत जाऊया' हे अभियान सुरू करणार आहे. यात वरिष्ठ अधिकाऱ्यांना जिल्हा दत्तक देऊन त्यांना तिथल्या शाळांची पाहणी करण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी काल मुंबईत वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली.

**<u>एस.टी. उत्पन्न</u>**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम व्हावं यासाठी विनावाहक बससेवेला प्राधान्य देण्याचे निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले आहेत. एसटी महामंडळाच्या मुख्यालयात घेण्यात आलेल्या आढावा बैठकीत ते काल बोलत होते. एसटीच्या उत्पन्न वाढीसाठी नाविन्यपूर्ण प्रयोग राबवावेत, अशी सूचनाही सरनाईक यांनी यावेळी केली.

**<u>राहुल गांधी</u>**

केंद्र सरकारचं जागतिक धोरण अयशस्वी ठरलं असून आपण अमेरीकेच्या दबावाखाली वागत आहोत, अशी टीका कॉंग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी काल नाशिक इथं केली. कॉंग्रेस पक्षाच्या सृजन संघटन अभियानाअंतर्गत आयोजित दहा दिवसांच्या निवासी शिबीराचा समारोप काल राहुल गांधी यांच्या उपस्थितीत झाला. त्यावेळी ते बोलत होते. या दहा दिवसांच्या शिबीरात प्रशिक्षणार्थींना स्वावलंबनाचे धडे देण्यात आले, तसंच ध्यान धारणा आणि मार्शल आर्टही शिकवण्यात आले. शिबीराच्या समारोपाप्रसंगी सर्व जिल्हाध्यक्षांशी राहुल गांधी यांनी व्यक्तीगत संवाद साधून त्यांची मतं जाणून घेतली. नाशिकमध्ये सध्या बेमुदत धरणे आंदोलन करत असलेल्या आदिवासी विद्यार्थ्यांच्या 24 प्रतिनिधींशीही गांधी यांनी चर्चा केली.

**<u>दिशा सालियन-हायकोर्ट</u>**

दिवंगत अभिनेता सुशांत सिंह राजपूत याची मॅनेजर दिशा सालियन हिच्या मृत्यू प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयानं काल केंद्रीय अन्वेषण विभागाला दिले.

मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती सारंग कोतवाल आणि न्यायमूर्ती रणजितसिंह राजे भोसले यांच्या खंडपीठासमोर काल या प्रकरणाची सुनावणी झाली. त्यावेळी दिशा हिचे वडील सतीश सालियन यांचा जबाब नोंदवण्यासाठी आणि तक्रार दाखल करण्यासाठी एका वरिष्ठ आणि अनुभवी अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याचे आदेश न्यायालयानं सीबीआयला दिले. मात्र, तपासादरम्यान, सबळ पुराव्यांशिवाय कोणालाही आरोपी मानलं जाणार नाही, असंही न्यायालयाने स्पष्ट केलं.

दिशा सालियन हिचा 8 जून 2020 रोजी मुंबई उपनगरातल्या एका निवासी इमारतीच्या 12व्या मजल्यावरून पडून मृत्यू झाला होता. या प्रकरणी मुंबई पोलिसांनी अपघाती मृत्युची नोंद केल्याचा तसंच आपली दिशाभूल करत आत्महत्येचा निष्कर्ष स्वीकारण्यासाठी दबाव आणल्याचा आरोप तिचे वडील सतीश सालियन यांनी केला होता.

**आंदोलन**

वाढत्या महागाईच्या मुद्द्यावरून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीनं काल मुंबईतल्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस परिसरात आंदोलन करण्यात आलं. या आंदोलनात पक्षाच्या राष्ट्रीय कार्याध्यक्ष तथा खासदार सुप्रिया सुळे तसंच मुंबईतीतले पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येनं सहभागी झाले होते.

**रास्ता रोको**

मराठा आरक्षणाच्या मागण्यांसाठी उपोषणाला बसलेल्या मनोज जारांगे यांची आमदार प्रसाद लाड यांनी काल भेट घेतली. जरांगे यांनी केलेल्या मागण्यांचा मसुदा त्यांना वाचून दाखवला, तसंच यावर तातडीने अंमलबजावणी करणार असल्याचं सांगितलं; मात्र पूर्ण याबाबत शासन निर्णय काढल्यानंतरच उपोषण सोडणार असल्याचं जरांगे यांनी म्हटलं आहे.

दरम्यान जरांगे पाटील यांच्या आंदोलनाच्या समर्थनार्थ बीड-परळी राष्ट्रीय महामार्गावरील जरूर फाटा इथं, तसंच लातूर इथंही आंदोलन करण्यात आलं.

**बीड-पुणे**

'बीड-पुणे' रेल्वे येत्या 17 सप्टेंबर रोजी, मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या मुहूर्तावर धावणार असून, त्यासाठी आवश्यक सर्व तांत्रिक आणि सुरक्षाविषयक चाचण्या पूर्ण करण्यात आल्याचं उपमुख्यमंत्री आणि बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार यांनी सांगितलं. 'अहिल्यानगर-बीड-परळी' रेल्वे मार्गाच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी पवार यांच्या अध्यक्षतेखाली काल मुंबईत बैठक झाली त्यावेळी त्या बोलत होत्या. डिसेंबरअखेर बीड-मुंबई रेल्वे सेवा सुरू करण्याच्या दृष्टीने सर्व कामं युद्ध पातळीवर पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

**कामगारांशी संवाद**

'महाराष्ट्राची कौशल्यशक्ती आता जगभर' या कार्यक्रमांतर्गत इस्रायलमध्ये रोजगारासाठी निवड झालेल्या राज्यातील 103 कुशल बांधकाम कामगारांपैकी 60 जणांची पहिली तुकडी आज रवाना होत आहे. राज्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी काल मुंबईत या कामागरांशी संवाद साधला. इस्रायलमध्ये रोजगारासाठी जाणाऱ्या युवकांनी कठोर परिश्रम करून आपल्या कुटुंबासह राज्याचा आणि देशाचा नावलौकिक वाढवावा, असं लोढा यावेळी म्हणाले.

**क्रिकेट**

संयुक्त अरब अमिरात इथं सुरू असलेल्या महिलांच्या टी-20 आशिया करंडक 2026 स्पर्धेत 'अ' गटात, आज संध्याकाळी भारताचा दुसरा सामना हाँगकाँगशी होणार आहे. रात्री आठ वाजता सामना सुरू होईल. रविवारी झालेल्या पहिल्या सामन्यात भारतानं थायलंडवर 94 धावांनी दणदणीत विजय मिळवला आहे.

**हवामान**

राज्यात गेल्या चोवीस तासांत कोकणात बहुतांश ठिकाणी तर मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पावसानं हजेरी लावली. आजही राज्यात सर्वच विभागात बहुतांश ठिकाणी पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.**

**नमस्कार.**